ePaper

## ‘जिकेल त्याचा मतदारसंघ हे महाविकास आघाडीचे सूत्र’; संजय राऊत



| वर्ष - 7 | अंक - 229 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com | गुरुवार, दिनांक 28 डिसेंबर 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

### आतील पानांत

- राज्यात 87 नव्या कोविडबाधितांची नोंद
- 'भारत जोडो यात्रे'चं दुसरं पर्व!
- सलमानच्या घराबाहेर जल्लोष
- एल्गारच्या शतकाने वाढली चिंता!

# मराठा आरक्षणासाठी 19 मुद्दे निर्णायक!

## » मागासवर्ग आयोगाच्या बैठकीत निकषनिश्चिती; अंतिम निर्णय 4 जानेवारीला

### » ‘गोखले इन्स्टिटयूट’ला नमुना तपासणीचे काम

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**मराठा समाजाचे सामाजिक, शैक्षणिक आणि आर्थिक मागासलेपण ठरविण्यासाठी राज्य मागासवर्ग आयोगाने बुधवारच्या बैठकीत १९ निकष निश्चित केले. मात्र आयोगाच्या या बैठकीला ११ पैकी केवळ पाच सदस्यच उपस्थित असल्यामुळे निकष अंतिम करण्यासाठी ४ जानेवारीला पुण्यात पुन्हा बैठक घेण्यात येणार आहे. ‘गोखले इन्स्टिटयूट’ला नमुना तपासणीचे काम देण्यात आले असून, त्याबाबतचा अहवाल आयोगाला सादर केला जाणार आहे. त्याच्या आधारे आयोगाने तयार केलेल्या चार उपसमित्या सर्वेक्षणाचे काम करणार आहेत. महिनाभराच्या कालावधीत हे सर्वेक्षण पूर्ण करून राज्य सरकारला अहवाल देण्यात येणार आहे.**





राज्य सरकारने हिवाळी अधिवेशनात न्यायमूर्ती सुनील शुक्रे यांची राज्य मागासवर्ग आयोगाच्या अध्यक्षपदी नियुक्ती केली. तसेच आणखी दोन सदस्यांचीही नियुक्ती करण्यात आली आहे. न्यायमूर्ती शुक्रे यांच्या अध्यक्षतेखाली बुधवारी पुण्यात आयोगाची बैठक झाली. या बैठकीला आयोगाच्या १३ सदस्यांपैकी पाच सदस्य उपस्थित होते. बैठकीत मराठा समाजाचे मागासलेपण ठरविण्यासाठी निकष निश्चित केले. त्यावर चर्चा करण्यात आली. मात्र, हे निकष अंतिम करण्यासाठी ४ जानेवारीला पुन्हा पुण्यात बैठक घेण्यात येणार आहे.

### मेश्राम यांच्या उपस्थितीवरून वाद

राज्य मागासवर्ग आयोगाचे सदस्य चंद्रलाल मेश्राम यांच्या उपस्थितीवरून वाद निर्माण झाला आहे. मेश्राम हे आयोगाचे ज्येष्ठ सदस्य असून, निवृत्त न्यायमूर्ती आहेत. आयोगाने त्यांना बैठकांना अनुपस्थित असल्याबाबत नोटीस दिली होती. त्या नोटिशीला मेश्राम यांनी उत्तर दिले आहे. त्यांनी हजेरी पुस्तकाची प्रत जोडून ९९ टक्के बैठकांना उपस्थित असल्याचा दावा केला आहे.





### आर्थिक निकष

» दारिद्र्य रेषेखालील कुटुंबांचे प्रमाण राज्याच्या एकूण कुटुंबांपेक्षा २५ टक्क्यांपेक्षा जास्त असलेला वर्ग (२०)

» असा वर्ग ज्यामध्ये किमान ३० टक्के लोक ग्रामपंचायत कायद्यानुसार घोषित कच्च्या घरांमध्ये राहतात. (१०)

» अल्पभूधारक कुटुंबांची संख्या राज्य सरासरीच्या १० टक्क्यांपेक्षा अधिक असलेला वर्ग. (१०)

» असा वर्ग ज्यामध्ये भूमिहीन कुटुंबांची संख्या राज्याच्या सरासरीपेक्षा किमान १० टक्क्यांपेक्षा अधिक आहे. (१०)

» सभासद किंवा संस्थांच्या मालकीच्या शैक्षणिक संस्था, औद्योगिक प्रतिष्ठान किंवा रोजगाराचे इतर स्रोत नसलेला वर्ग. (१०)

» असा वर्ग ज्यामध्ये उपभोग कर्ज घेतलेल्या कुटुंबांचे प्रमाण राज्याच्या सरासरीच्या २५ टक्क्यांपेक्षा अधिक आहे. (१०)

### शैक्षणिक निकष (80 गुण)

» पहिली ते दहावी दरम्यान शिकणाऱ्या विद्यार्थ्यांचे प्रमाण राज्याच्या सरासरीच्या १० टक्क्यांपेक्षा कमी असणारा वर्ग. (१०)

» असा वर्ग ज्यामध्ये दहावी उत्तीर्णांचे प्रमाण राज्याच्या सरासरीच्या २० टक्क्यांपेक्षा कमी आहे. (१०)

» असा वर्ग ज्यामध्ये मुलींच्या शाळागळतीचे प्रमाण पहिली ते दहावीदरम्यान सरासरीच्या २० टक्क्यांपेक्षा जास्त आहे. (२०)

» बारावी उत्तीर्णांचे प्रमाण राज्याच्या सरासरीच्या २० टक्क्यांपेक्षा कमी असलेला वर्ग. (१०)

### सामाजिक मागासलेपण (कंसात गुण)

» जाती/ पारंपरिक व्यवसाय/ हस्तकला कारागिरी/रोजगार या कारणांमुळे अशा वर्गाला सामाजिक स्तरात कनिष्ठ समजले जाते. (२०)

» राज्याच्या सरासरीच्या पाच टक्क्यांपेक्षा अधिक स्त्रिया निर्वाहासाठी व्यवसाय/रोजगार/ मजुरीमध्ये हलक्या कामात गुंतलेल्या आहेत, असा वर्ग. (२०)

» राज्याच्या सरासरीच्या पाच टक्क्यांपेक्षा अधिक पुरुष निर्वाहासाठी व्यवसाय/रोजगार/ मजुरीमधे हलक्या कामात गुंतलेले आहेत, असा वर्ग (२०)

» ज्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सामाजिक आणि सांस्कृतिक वातावरण अनुकूल नाही, असा वर्ग (१०)

» राज्याच्या सरासरीच्या पाच टक्क्यांपेक्ष अधिक पुरुषांचा आणि दहा टक्क्यांपेक्षा अधिक स्त्रियांचा बालविवाह केला जातो, असा वर्ग. (१०)

» अंधश्रद्धाळू प्रथा आणि अंधविश्वास सर्रास आढळणारा वर्ग. (१०)

» स्त्रियांच्या प्रतिष्ठेला उणेपणा आणणाऱ्या चालीरीती सर्रास असणारा वर्ग. (१०)

** पदवी किंवा पदव्युत्तर किंवा तत्सम शिक्षण घेणाऱ्यांचे प्रमाण राज्याच्या सरासरीच्या १० टक्क्यांपेक्षा कमी असलेला वर्ग. (१०) * असा वर्ग ज्यामध्ये व्यावसायिक अभ्यासक्रम जसे वकिली, वैद्यकीय, अभियांत्रिकी-तंत्रज्ञान, चार्टर्ड अकाउंटंट शिकणाऱ्यांचे प्रमाण राज्याच्या सरासरीच्या २० टक्क्यांपेक्षा कमी आहे. (२०)*

# कोल्हेंचा पराभव करणं सोपं नाही

## » तुम्ही आव्हान दिलं पण त्यात दुरुस्ती होईल : जयंत पाटील

। पुणे । महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**शिरूरचे खासदार अमोल कोल्हे (AMOL KOLHE) यांचा पराभव करणं सोपं नाही, अमोल कोल्हे यांनी लोकसभेत सर्वाधिक प्रभावी पद्धतीने प्रश्नांची मांडणी केली आहे असं राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील (JAYANT PATIL) यांनी म्हटलं. अमोल कोल्हे यांना त्यांच्या लोकसभा मतदारसंघात अधिक प्रोत्साहन द्याल असा मला विश्वास आहे.**



काहींनी अमोल कोल्हे यांना आव्हान दिलं, तुम्ही आव्हान देता पण यात दुरुस्ती व्हायला हवी अशी अपेक्षा आहे असंही ते म्हणाले. राष्ट्रवादी शरद पवार गटाचे खासदार डॉ. अमोल कोल्हे यांच्या शेतकरी आक्रोश मोर्चामध्ये बोलत होते. जयंत पाटील म्हणाले की, "आज काही लोकं अमोल कोल्हे यांना पराभव करायचा प्रयत्न करत आहेत. ज्या व्यक्तीने शिवाजी महाराजांना घरापर्यंत पोहचवले त्यांना पराभूत करणे सोपे नाही. संभाजी महाराज, शिवाजी महाराज यांची खरी ओळख कोल्हेंनी जनतेला करून दिली. तसेच आण्णाजी पंत कोण आहे याची ओळख करण्याचे कामही त्यांनी केलं. अमोल कोल्हे तुम्ही या लोकसभा मतदारसंघांमध्ये फिरा, पण मला तुम्हाला महाराष्ट्रात घेऊन फिरायचे आहे. शिवस्वराज्य यात्रेची कल्पना मी अमोल कोल्हे यांना दिली होती, तेव्हा अमोल मिटकरी देखील आमच्या बरोबर असायचे. त्यावेळी आम्ही 54 आमदार निवडून आणले." अमोल कोल्हे यांचे अभिनंदन यासाठी की देशातील आणि राज्यातील अनेक खासदार कदाचित वेगळे प्रश्न मांडत असतील, पण सगळ्यात प्रभावी मांडणी कोणी लोकसभेत केली असेल तर अमोल कोल्हे यांनी केलं. नुसतं युट्यूबवर अमोल कोल्हे आणि त्यांची लोकसभेतील भाषण ऐका मग समजेल. अमोल कोल्हे हा मोर्चा घेऊन सगळ्यांच्या समोर अनेक प्रश्न घेऊन आले आहेत. मला वाटलं होतं की संसदेतील खासदार असा शेतकरी आक्रोश मोर्चा काढतोय की राज्यातील नेत्यांनी त्यांची दखल घ्यावी. या मोर्चेला कमी लेखण्याचा काम करण्यापेक्षा आम्ही सगळ्या प्रश्नांना न्याय देऊ असे सांगायला पाहिजे होते. आज मला खंत वाटते की दिलीप मोहिते यांनी आमचे व्यासपीठ सोडले आहे आणि मला मनापासून दुख वाटतं. माणसाच्या आयुष्यात काही प्रसंग येत असतात की ठामपणे भूमिका घेऊ शकतो. कसं काय राव कसं केलं तुम्ही? मी काही लोकांना विचारलं तर लोकं म्हणतात सध्या सगळीकडे दहशत आहे. शिवसेना, काँग्रेस आणि पवार साहेबांची राष्ट्रवादी काँग्रेस सत्तेत परत येईल असे तरुण म्हणतात. सी व्होटरने सर्व्हे केला आहे, महाविकास आघाडीचा आकडा सध्या 29 आहे. ज्यावेळी वज्रमूठ सभा सुरू होतील आणि जेव्हा आमचे नेते सभेसाठी एकत्र येतील तेव्हा महाराष्ट्र ढवळून निघेल आणि जनमत काय आहे ते स्पष्ट होईल. कुठल्या ही नेत्याला कांदा निर्यातीसंदर्भात बोलता येत नाही. पण आपण दिल्लीच्या तख्तासमोर झुकायचे नाही. शरद पवार आक्रमकतेने नाहीतर सौम्यातेने सगळ्या गोष्टी करत आहेत. हळूहळू या सगळ्या परिस्थितीवर मात करण्याची मानसिकता 84 वर्षाच्या व्यक्तीत दिसते. एकसंघाने दोन्ही निवडणुका झाल्या तर मोठ्या प्रमाणात आपण निवडणुका जिंकू. पवार साहेबांच्या, उद्धव ठाकरे आणि इंडियाच्या मागे उभे रहा. बाबरी मशीदीच्या पतनावेळी बाळासाहेब ठाकरे यांनी जबाबदारी घेतली होती, पण भाजपमधील कोणी पुढे आलं नव्हतं. बाळासाहेब यांचे चिरंजीव म्हणून उद्धव ठाकरे यांना अयोध्येत बोलवायला हवे होते. त्यांना निमंत्रणच नाही हे किती दुर्दैवी आहे.

### कलश यात्रा ही राजकीय नसावी

» जानेवारी महिना हा रामाचा महिना म्हणून सोडून द्या रामाचे गुण हे सगळे पाळण्याचं काम आमची महाविकास आघाडी करेल. राम हा भारत भूमीचा देव आहे. सगळ्यांना आता अक्षता देण्यात येतील. कलश यात्रा ही राजकीय नसावी. जानेवारी हा महिना रामाचा महिना म्हणून तुम्ही सोडून द्या. कारण सत्तेतील लोकांना प्रश्न विचारले तर ते या महिन्यात सोडविणार नाहीत. रामाला कब्जात घेण्यासाठी सरकार जानेवारी महिन्यात सुट्टीवर गेले आहे. काहींनी अमोल कोल्हे यांना आव्हान दिलं, तुम्ही आव्हान देता पण यात दुरुस्ती व्हायला हवी अशी अपेक्षा आहे असंही ते म्हणाले. राष्ट्रवादी शरद पवार गटाचे खासदार डॉ. अमोल कोल्हे यांच्या शेतकरी आक्रोश मोर्चामध्ये बोलत होते. जयंत पाटील म्हणाले की, "आज काही लोकं अमोल कोल्हे यांना पराभव करायचा प्रयत्न करत आहेत. अमोल कोल्हे यांचा पराभव करणं सोपं नाही

# अजित पवार पालकमंत्री झाल्यानंतर निधी मिळाला नाही

## » भाजप आणि शिंदे गटाच्या जिल्हा नियोजन समितीनी केला आरोप

। पुणे ।महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**अजित पवार पुण्याचे पालकमंत्री झाल्यानंतर आपल्याला विकासनिधी मिळत नसल्याचा आरोप पुणे जिल्ह्यातील भाजप आणि एकनाथ शिंदे गटाच्या जिल्हा नियोजन समितीच्या सदस्यांनी केलाय. भाजप आणि शिंदे गटाच्या या नेत्यांनी पुण्याचे जिल्हाधिकारी राजेश देशमुख यांच्याकडे अजित पवारांची तक्रार केलीय आणि तसे निवेदन दिलेय.**

अजित पवारांच्या आधी चंद्रकांत पाटील पुण्याचे पालकमंत्री असताना त्यांनी मंजूर केलेल्या विकास कामांचा निधी अजित पवारांनी अडवून धरल्याचा या सदस्यांचा आरोप हा 800 कोटी रुपयांचा निधी तात्काळ रद्द करण्यात यावा, अन्यथा न्यायालयात जाऊ असा इशारा भाजप आणि शिंदे गटाच्या सदस्यांनी दिला आहे. आशा बुचके , विजय फुगे, आनंदा नंदे , वासुदेव काळे, कांचन अलंकार , शरद बुट्टे पाटील, प्रवीण काळभोर , पांडुरंग कचरे, अमोल पांगारे, जीवन कोंडे या भाजप आणि शिंदे गटाच्या सदस्यांनी अजित पवारांविरुद्ध तक्रार केलीय. 19 मे 2023 रोजी पुणे जिल्हा नियोजन समितीची बैठक तत्कालीन पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांचे अध्यक्षतेखाली संपन्न झाली होती. सदर बैठकीला जिल्हा नियोजन समितीचे सदस्य, आमदार, खासदार यांचेसह राज्याचे विरोधी पक्षनेते तसेच राज्याचे माजी



मुख्यमंत्री व देशाचे माजी मंत्री शरद पवार साहेब व सदस्य सचिव म्हणून आपण उपस्थित होता. अधिकारी या बैठकीत जिल्हा नियोजन समितीच्या विषयवार कामकाजासोबत जिल्ह्यातील अनेक प्रश्नावर चर्चा झाली आणि पालकमंत्री महोदयांनी त्याबाबत योग्य त्या सूचना सर्व संबंधितांना दिल्या. तसेच सर्वपक्षीय लोकप्रतिनिधी आणि जिल्हा नियोजन समितीचे सदस्य यांनी सुचविलेल्या जिल्हा वार्षिक योजना आराखडा 2023-24 मधील विकासकामांना मान्यता देण्याचे निश्चित झाले होते. याबाबत पालकमंत्र्यांनी सर्वांची विकास कामे समाविष्ट करून या याद्यांचे एकत्रिकरण करून अंतिम याद्या इतिवृत्तासोबत सदर करणे बाबत सूचित केले होते व तशी कार्यपद्धती अमलात असल्याचे आपणास माहित आहे. त्यानुसार जिल्ह्यातील सर्व लोकप्रतिनिधी व जिल्हा नियोजन समिती सदस्य यांनी मागणी केलेली व निश्चित केलेली सर्व विकास कामे (जिल्हा परिषदेकडील योजना) एकत्रित करून 3 जुलै असे असतानाही आपल्या स्तरावरून या बैठकीचे इतिवृतांत आज 26 डिसेंबर 2023 पर्यंत म्हणजेच गेली 7 महिने झाले तरी अंतिम करून तत्कालीन पालकमंत्री महोदयांच्या स्वाक्षरीसह आम्हा सदस्यांना प्राप्त झालेले नाही, त्यामुळे या बैठकीत मंजूर झालेल्या विकासकामांवर परिणाम झाला.

### कामकाज गेली 7 महिने ठप्प

» सर्व विभागांचे कामकाज गेली 7 महिने ठप्प झाले असून, यातून कल्याणकारी राज्याच्या संकल्पनेतून होणे आवश्यक्य जनतेच्या विकासकामांचे अतिशय मोठे नुकसान झालेले आहे. योजनेच्या आराखड्याच्या माध्यमातून जिल्ह्यातील सर्वांगीण विकासाचे काम पूर्णपणे थांबविण्यात आले आहे. हि बाब जिल्हा नियोजन समिती कायदयातील मुळ संकल्पनेच्या पूर्णपणे विरोधी ठरत आहे.जिल्हा नियोजन समितीचे बैठकीमध्ये सन 2023-24 साठी तयार करण्यात आलेल्या प्रारूप आराखड्यातील कामांना प्राधान्याने मान्यता घेणे आवश्यक आहे.

# अजितदादांच्या कट्टर समर्थकाचे ठरले!

## संजोग वाघेरे शनिवारी शिवबंधन बांधणार; राष्ट्रवादीत कोणावर नाराजी नाही

। पिंपरी । महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**शहराचे माजी महापौर, राष्ट्रवादी काँग्रेसचे माजी शहराध्यक्ष संजोग वाघेरे यांनी अखेर लोकसभा निवडणूक लढविण्यासाठी ठाकरे गटात जाण्याचा निर्णय घेतला आहे. शनिवारी ते शिवबंधन बांधणार आहेत. ठाकरे गटाकडून वाघेरे यांना मावळमधून उमेदवारी मिळण्यावर शिक्कामोर्तब झाल्याची चर्चा आहे. वाघेरे यांचा पक्षप्रवेश उपमुख्यमंत्री अजित पवार यांना धक्का मानला जात आहे.**





महायुतीमध्ये मावळ लोकसभा मतदारसंघ मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेकडे राहणार असल्याचे जवळपास निश्चित झाले. त्यामुळे मागील दोन टर्म लोकसभा निवडणूक लढविण्यासाठी तीव्र इच्छुक असलेल्या संजोग वाघेरे यांनी ठाकरे गटाकडे जाण्याचा निर्णय घेतला. दोन दिवसांपूर्वी त्यांनी उद्धव ठाकरे यांची भेट घेत मावळमधून लोकसभा निवडणूक लढविण्याची इच्छा व्यक्त केली होती. त्यावर ठाकरे यांनी दोन दिवसांचा वेळ मागितला होता.

बुधवारी वाघेरे यांना निरोप आला असून पक्ष प्रवेशासाठी शनिवारी बोलविण्यात आले आहे. त्यामुळे वाघेरे यांच्या उमेदवारीवर ठाकरे गटाने शिक्कामोर्तब केले असल्याचे बोलले जात आहे. वाघेरे यांचे वडील भिकू वाघेरे शहराचे महापौर होते. वाघेरे घराणे पवार कुटुंबाशी एकनिष्ठ होते. संजोग वाघेरे यांनी महापौर, राष्ट्रवादीचे अध्यक्षपद भूषविले होते. पक्षातील फुटीनंतर ते अजित पवार यांच्या गटात होते. लोकसभा निवडणूक लढविण्यासाठी ठाकरे गटात जाण्याचा निर्णय घेतला आहे.

राष्ट्रवादीचा एक कार्यकर्ता म्हणून गेली अनेक वर्ष झालं मी काम करत आहे. राष्ट्रवादीचे शरद पवार आणि अजित पवार यांच्यावर मी नाराज नाही.राष्ट्रवादीतील कोणत्याही नेत्याबाबत नाराजी नाही. उमेदवारीची चर्चा झाली आहे. दोन

### ठाकरे गटाकडून मावळ लोकसभेची उमेदवारी!

» अजित पवार यांचे अत्यंत विश्वासू असे पिंपरी- चिंचवड शहराचे माजी शहराध्यक्ष तथा माजी महापौर संजोग वाघेरे हे शिवसेना उद्धव ठाकरे गटाच्या दिशेने वाटचाल करत आहेत. सोमवारी मातोश्रीवर संजोग वाघेरे यांनी उद्धव ठाकरे यांची भेट घेऊन पक्ष प्रवेशाबाबत चर्चा केली. राष्ट्रवादी पक्षातील कुठल्याही स्थानिक नेत्यावर किंवा शरद पवार, अजित पवार यांच्यावर नाराज नसून खासदार व्हायचं असल्यानेच शिवसेना उद्धव ठाकरे गटाकडे जाण्याचा निर्णय घेतला आहे. अद्याप पक्ष प्रवेश केला नसला तरी येणाऱ्या दोन ते तीन दिवसांमध्ये याबाबत निर्णय घेणार असल्याचं संजोग वाघेरे यांनी लोकसत्ता ऑनलाइनशी बोलताना म्हटल आहे. २०१४ पासून संजोग वाघेरे हे लोकसभेची तयारी करत आहेत. मात्र, पक्ष संधी देत नसल्याने त्यांनी शिवसेना उद्धव ठाकरे गटात जाण्याचा जवळपास निर्णय घेतल्याचं त्यांनी सांगितलं. यावेळी संजोग वाघेरे म्हणाले, मातोश्रीवर जाऊन शिवसेना पक्ष प्रमुख उद्धव ठाकरे यांना भेटलो. माझ्या मताबाबत त्यांच्याशी चर्चा केली. मावळ लोकसभा मतदारसंघासाठी मी इच्छुक आहे. माझी ही भूमिका उद्धव ठाकरे यांच्यासमोर मांडली. येणाऱ्या दोन ते तीन दिवसांमध्ये पक्ष प्रवेशा बाबत मी निर्णय घेणार आहे. राष्ट्रवादीचा एक कार्यकर्ता म्हणून गेली अनेक वर्ष झालं मी काम करत आहे. राष्ट्रवादीचे शरद पवार आणि अजित पवार यांच्यावर मी नाराज नाही. स्थानिक नेतृत्वावर देखील माझी कोणावर नाराजी नाही. खासदार व्हायची माझी इच्छा आहे. पिंपरी विधानसभा मतदारसंघावर आणखी पाच वर्षी मागासवर्गीय आरक्षण राहणार आहे. गेल्या २०१४ पासून मी मावळ लोकसभेची तयारी करत आहे. मावळ लोकसभा मतदारसंघ शिंदे गटाला सुटलेला आहे. म्हणून शिवसेनेची दार ठोठावलेली आहेत.

# सुरेश गादीया आणि अमृत पऱ्हाड यांना भाजपने वाहिली श्रद्धांजली!

## भाजपा परिवारातील एक निष्ठावंत सहकारी गमाविणे हे अत्यंत वेदनादायक

। पिंपरी । महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**भाजप मधील या दोन्ही माजी नगरसेवकांचे पक्षातील योगदान हे प्रेरणादायी असेच आहे. त्यांच्या सारख्या असंख्य कार्यकर्त्यांच्या मेहनतीने हा पक्ष उभा राहिला आहे. जुने आणि नवीन कार्यकर्ते यांनी एकत्रित पणे संघटनेची मुठ बांधून पुन्हा एकदा नरेंद्र मोदी साहेबांना पंतप्रधान करणे हिच खरी या दोघांनाही श्रद्धांजली ठरणार आहे. असे जिल्हा अध्यक्ष शंकर जगताप यांनी सांगितले..**



भाजपा परिवारातील एक निष्ठावंत सहकारी गमाविणे हे अत्यंत वेदनादायक आहे. असे महेश कुलकर्णी म्हणाले.

साधी राहणी व उच्च विचारसरणी असलेले स्वर्गिय सुरेश गादिया यांच्या परिचयात जो येईल त्याचे ते मन जिंकून घ्यायचे. शहरात त्यांनी अनेक माणसे जोडली. जमेल तितकी मदत समोरच्या व्यक्तीला करणे ह्या स्वभावामुळे त्यांचा सगळ्यांनाच आधार वाटायचा असे मत जैन समाजाचे कासारवाडी विभागातील संघटक विलास म्हणाले. पक्ष संघटना बळकट करणे हे त्यांच्याकडून शिकण्यासारखे होते. त्यांच्या जाण्याने भाजपाने एक संघटक गमविला, असे मनोगत सदाशिव खाडे यांनी व्यक्त केले. अशा कार्यकर्त्यांच्या जाण्याने पक्षाची प्रचंड मोठी हानी होत आहे. अशी माणसे पुन्हा निर्माण होऊ शकत नाहीत. अत्यंत कठीण प्रसंगात त्यांनी केलेले पक्ष कार्य हे खरोखर कधीही न विसरण्या जोगेच आहे. असे मत अत्यंत जुने कार्यकर्ते नरहरी वाघ यांनी व्यक्त केले. प्रस्थापित गाववाल्यांच्या कळपात राहून तीन वेळा नगरसेवक होणे हे अमृत पऱ्हाड यांचे योगदान अनन्यसाधारण आहे. तर सुरेश गादिया यांच्या सारखा कुशल संघटक आणि एक अत्यंत चांगला मित्र गमावल्याचे प्रचंड दुःख असल्याचे त्यांचे सहकारी कार्यकर्ते अविनाश मोरे यांनी सांगितले. या प्रसंगी वरिष्ठ उपाध्यक्ष व प्रवक्ते राजू दुर्गे, जिल्हा सरचिटणीस नामदेव ढाके, जिल्हा सरचिटणीस अजय पाताडे, प्रदेश सदस्य माऊली थोरात यांनी देखील शोक व्यक्त करून माजी नगरसेवक सुरेश गादीया आणि अमृत पऱ्हाड यांना श्रद्धांजली वाहिली. त्याच बरोबर भाजपा पिंपरी चिंचवड शहर (जिल्हा) संपूर्ण कार्यकारणीच्या वतीनेही दोघांना भावपूर्ण श्रध्दांजली वाहण्यात आली.


### शोकसभेला यांची प्रामुख्याने उपस्थिती...

» यावेळी, भाजपा जिल्हा अध्यक्ष शंकर जगताप यांच्यासह प्राधिकरणाचे माजी अध्यक्ष सदाशिव खाडे, चिंचवड विधानसभा अध्यक्ष काळूराम बारणे, वरिष्ठ उपाध्यक्ष व प्रवक्ते राजू दुर्गे, सरचिटणीस नामदेव ढाके, अजय पाताडे, उपाध्यक्ष माउली थोरात, विलास पगारिया, महेश कुलकर्णी, अविनाश मोरे, राजेंद्र बाबर, नरहरी वाघ, सुभाष सरोदे, गणेश ढाकणे, देविदास पाटील, रविंद्र नांदुरकर, राजेंद्र शिरसाठ, अमित कांकरिया, सुरेश गादिया, दशरथ शिंदे, स्नेहलकुमार लुणावत, विमल शिंपी, टिलकचंद बच्छवाल, निलेश शिंदे, असरफ पठाण, पल्लवी वाल्हेकर, किर्ती परदेशी, सविता शिवले, माधुरी राऊत, रेखा दुधभाते, अंजली गायकवाड, रोहिणी मांढरे, अमित कुलकर्णी, किशोर साळुंखे, रेखा काटे, सीमा चव्हाण, शशिकांत दुधारे, नितीन काळे, कपिल विश्नोई, अनंत देशमुख, पराग जोशी, ओंकार भोंडवे, विनय मलहोत्रा, करण साळुंखे, सुधाकर काळे, मुकेश चुडासमा, जरिधन पहियार, गणेश गांधी, प्रतिक गाडे, संदिप तांबे, भुषण जोशी, प्रविण राजपुरोहित, नितीन पुरोहित, संजय जहांगिर, भरत जांगिड, अलताफ पिंजारी, डॉ. महेश कुदळे, संदिप गायकवाड, पंकज मुथा, विकी गायकवाड, विजय थोरात, ॲड. अनंता देशपांडे, अमेय देशपांडे आदी उपस्थित होते.




# शिक्षणातून सर्वसमावेशी नेतृत्वाकडे

**गेल्या वर्षभरात या सदरातील लेखातून शिक्षणात परिघावर असणाऱ्या आणि सर्वार्थाने प्रवाहाबाहेर फेकल्या गेलेल्यांबद्दल आपण बोलत आहोत. त्यावर पाठबळ देणाऱ्या व प्रतिवाद करणाऱ्याही प्रतिक्रिया आल्या, मात्र मांडणीचा पाया शिक्षणाच्या लोकशाहीकरणाचा असल्याने मुख्य मुद्दयाला कुणी बाजूस सारू शकले नाही.**



सॉक्रेटिस म्हणतो की शिक्षण तेच जे माणसाला विचार करायला शिकवतं. परिघावरील लोकसमुदायासाठी उपलब्ध असणारं शिक्षण विचार करायला लावणारं आहे का? बाबासाहेब आंबेडकर म्हणतात, "शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा" यात सर्वात आधी शिक्षण येतं. ज्या वेळी उपेक्षित समुदाय शिक्षण घेऊन संघटित होईल आणि मग संघर्ष करेल त्या वेळी त्यांचं संघटन आणि संघर्ष कोणीच हाणून पाडू शकणार नाही. म्हणून वंचित समुदायातील विद्यार्थ्यांची प्राथमिकता शिक्षण असली पाहिजे, जेणेकरून कोणीही त्यांचा वापर 'फूट सोल्जर' म्हणून करून घेणार नाही. उच्च शिक्षणातील विषमता मिटविण्यासाठी एकलव्य चळवळ उभी आहे, कारण शिक्षण ही कुणा एका घटकाची मालकी नाही तर तो सर्वांचा हक्क आहे आणि तो तळागाळातील सर्वांना मिळेल त्या वेळी खऱ्या अर्थाने शिक्षणाचं लोकशाहीकरण होईल. आज वंचित समुदायातील किती वकील हे सर्वोच्च न्यायालयात न्यायाधीश आहेत? प्रतिष्ठित शिक्षणसंस्थांत प्राध्यापक आहेत? महत्त्वाच्या प्रसारमाध्यमांचे संस्थापक आहेत? माध्यमांत दलित, आदिवासी आणि उपेक्षितांचा आवाज का दाबला जात आहे? हे प्रश्न मला अस्वस्थ करतात. उपेक्षित समुदायाला प्रतिनिधित्व नसल्याने त्यांच्या हक्क आणि प्रश्नांकडे दुर्लक्ष होतं. विषमतावादी व्यवस्थेला छत्रपती शाहू महाराजांनी शिक्षणाच्या माध्यमातून सडतोड उत्तर दिलं, कर्मवीर भाऊराव पाटील यांनी रयतसारखी संस्था उभारून इतिहास घडवला, महात्मा फुलेंनी आणि सावित्रीमाईंनी बहुजनांसाठी शिक्षणाचा वणवा पेटवला. या सर्वांचा आदर्श आपल्या डोळयांसमोर आहे. आज आदिवासी, दलित, उपेक्षित समुदायचं प्रतिनिधित्व निर्णयप्रक्रियेत दिसत नाही. याचा अर्थ त्यांच्यात बौद्धिक क्षमता नाही, असं नाही, तर त्यामागचं कारण जातीय भेदभाव आणि संधीचा अभाव हे आहे. खरं तर वंचित आणि आदिवासी आज देशाच्या न्यायप्रक्रियेत सहभागीच नाहीत. आज देशात जे ९० सचिव आहेत त्यांपैकी केवळ तीन इतर मागासवर्गीय आहेत. आदिवासी, दलितांचा तर कुठे उल्लेखच नाही. यासाठीच जातीनिहाय जनगणना महत्त्वाची आहे, जेणेकरून विकासप्रक्रियेत जे मागे पडले आहेत त्यांना पुढे आणण्याचे प्रयत्न करता येतील. महाराष्ट्रात अशासुद्धा जाती आहेत ज्यांची नावंसुद्धा फार कोणाला माहीत नाहीत. त्यांचे शिक्षणामध्ये प्रतिनिधित्व नसल्यागतच आहे. भंगी, मेहतर, ओलगाना, माचीगार, भामटा, मलकाना अशा खूप जाती आहेत, त्यांचं काय? त्यांच्या विकासाचं उद्दिष्ट केवळ शिक्षणातूनच साध्य होऊ शकेल. आज काही धोरणकर्ते म्हणतात, की युवकांनी कौशल्याधारित शिक्षण घेतलं पाहिजे. ज्यांच्या पिढयान् पिढया इथल्या भांडवलदार वर्गाची गुलामी करत आल्या त्यांनी कौशल्याधारित शिक्षण घेऊन पुन्हा मजूरच व्हावे का? लवकर नोकरी लागते या भ्रमात बरेच ग्रामीण भागातील विद्यार्थी आयटीआयकडे वळतात. ज्यांची आयआयटीमध्ये जायची क्षमता असते तेसुद्धा यात अडकतात. उपेक्षित वर्गातील मुलांनीसुद्धा आयआयटीचा विचार केला पाहिजे. शिक्षण म्हणजे फक्त पदवी नाही, तो आत्मसन्मानाने जगण्याचा मार्ग आहे. तरुणांनी आपल्या समाजाचं प्रतिनिधित्व केलं तर येणाऱ्या पिढयांना शिक्षणासाठी संघर्ष करावा लागणार नाही. आज बाहेरचे लोक येऊन आदिवासींवर संशोधन करतात, त्यांचे प्रश्न मांडतात मग आदिवासींनी स्वतःचे प्रश्न का मांडू नयेत? आदिवासींनी आदिवासींसाठी कायदे केले पाहिजेत, योजना राबविल्या पाहिजेत, त्या त्यांच्या हिताच्या ठरतील. तेव्हाच त्यांच्याबाबतीत भेदभाव होणार नाहीत आणि कोणीही त्यांना विकासप्रक्रियेतून बाहेर काढणार नाही.

गेल्या पाच वर्षांत देशातील अग्रगण्य शिक्षणसंस्थांतून १५ हजारांहून अधिक एससी, एसटी, ओबीसी विद्यार्थ्यांची गळती झाली.

## संपादकीय »

### कल आणि 'कौल'!

***अलीकडे वातावरणात उदारमतवादाविषयीच एकंदर अनुदारता भरून राहिलेली असल्याने कौल यांच्या मुलाखतीची दखल घेऊन तीवर भाष्य आवश्यक ठरते.***

सर्वोच्च न्यायालयातील ज्येष्ठ न्यायाधीश संजय कृष्ण कौल मंगळवारी निवृत्त झाले. यानिमित्ताने त्यांनी 'द इंडियन एक्स्प्रेस'ला सविस्तर मुलाखत दिली. तिचा संपादित अंश आजच्या 'लोकसत्ता'त अन्यत्र वाचावयास मिळेल. तो अनेकांगांनी महत्त्वाचा आहे. न्या. कौल सात वर्षे सर्वोच्च न्यायालयात न्यायाधीश होते. त्याआधी दिल्ली उच्च न्यायालयाचे प्रभारी मुख्य न्यायाधीश, पंजाब-हरियाणा उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश आदी अनेक ठिकाणी न्यायदानाचा अनुभव त्यांच्या गाठीशी आहे. सर्वोच्च न्यायालयातही ते अनेक महत्त्वाच्या आणि दूरगामी परिणामकारक निर्णयांत सहभागी अनुच्छेद ३७०' रद्दबातल करण्याचा केंद्राचा निर्णय रास्त ठरवताना त्यांनी जम्मू-काश्मिरात सुरक्षा दल आणि अतिरेकी या दोहोंकडून झालेल्या मानवी हक्क उल्लंघन प्रकारांचा शोध घेण्यासाठी सत्यशोधक आयोग नेमण्याची शिफारस केली होती.

**दिल्लीत 'इंडिया'ची बैठक झाल्यापासून कटकथा (कॉन्स्पिरसी थिअरीज) रचल्या जात आहेत. इंडियाचा पंतप्रधान पदाचा चेहरा कोण असेल यासंदर्भात बैठकीआधी तृणमूल काँग्रेसच्या नेत्या ममता बॅनर्जी यांचे नाव घेतले जात होते. तीन दिवस ठाण मांडून बसलेल्या ममतांनीही नेत्यांच्या लॉबिइंगला अप्रत्यक्ष पाठिंबा दिला होता.**

# कटकथांपेक्षा जागावाटपच कळीचे!

मात्र बैठकीत अचानक ममता आणि आम आदमी पक्षाचे प्रमुख अरविंद केजरीवाल यांनी काँग्रेसचे पक्षाध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांच्या नावाचा प्रस्ताव ठेवला. या दोन नेत्यांनी असे का केले असावे, या मुद्दयावर सध्या खल सुरू आहे. खरगेंच्या नावावर काँग्रेसने उघडपणे कोणतीही प्रतिक्रिया दिलेली नाही. अर्थात त्यात फारसे नवल नाही. खरगे पक्षाध्यक्ष असले तरी त्यांच्याभोवती राहुल गांधींचे निष्ठावान आहेत. राहुल गांधींचे नाव पुढे करायचे असेल तर हे नेते उघडपणे प्रतिक्रिया देणार नाहीत हे ओघाने आलेच! पण, तीन आठवड्यांपूर्वीच खरगेंच्या आत्मचरित्रात्मक पुस्तकाच्या प्रकाशनावेळी, 'खरगे योग्य वेळी काँग्रेसचे पक्षाध्यक्ष झाले,' असे म्हणत सोनिया गांधींनी जाहीरपणे खरगेंना पाठिबा दिला. त्या कार्यक्रमामध्ये 'माकप'चे महासचिव सीताराम येचुरी, राष्ट्रीय जनता दलाचे नेते मनोज झा, 'द्रमुक'चे टी. आर. बालू या नेत्यांनीही खरगे हेच 'इंडिया'चे पंतप्रधान पदाचे



चेहरे होऊ शकतात, असे सूचित केले होते. त्यामुळे 'इंडिया'च्या बैठकीमध्ये खरगेंचे नाव सुचवले गेले तेव्हा खरे तर आश्चर्य वाटण्याजोगे काही नव्हते. तरीही कटकथा का फिरू लागल्या आहेत? काँग्रेसचे माजी अध्यक्ष राहुल गांधी यांनी जनता दलाचे (सं) प्रमुख नितीशकुमार यांच्याशी संवाद साधल्यापासून 'इंडिया'मध्ये काही तरी बिनसले असल्याची चर्चा केली जात आहे. त्याचा संबंध ममतांच्या प्रस्तावाशी जोडला जाऊ लागला आहे. खरगेंचे नाव घेतल्यामुळे नितीशकुमार नाराज असल्याचे बोलले जात आहे. एका कटकथेनुसार ममता आणि केजरीवाल भाजपच्या दबावाखाली काँग्रेसचा बळी देत असल्याचे सांगितले जाते. मोदींविरोधात खरगेंचा चेहरा असेल तर दक्षिण-उत्तर विभाजन होऊन भाजपला त्याचा उत्तरेत दणदणीत लाभ मिळेल असे मानले जात आहे. खरगेंच्या नावावर शिक्कामोर्तब झाले की, नितीशकुमार पंतप्रधान पदाच्या स्पर्धेतून बाहेर होतील. मोदीविरोधात लढण्यासाठी हिंदी पट्टयातील नेता हवा, तो नितीशकुमारच असू शकतील, ही कटकथेतील उपकथा आहे. या कथा-उपकथेत आणखी एक पिल्लू ममतांनीच सोडून दिलेले आहे. वाराणसीमध्ये मोदींविरोधात प्रियंका गांधी-वाड्रा 'इंडिया'कडून योग्य उमेदवार ठरू शकतील असाही मुद्दा 'इंडिया'च्या बैठकीत उपस्थित झाला होता. 'इंडिया'च्या बैठकीनंतर महाआघाडीतील नेत्यांनीच गोंधळ उडवून दिला आहे. त्यामुळे कथा-उपकथा रचल्या जात आहेत. पण, खरा मुद्दा जागावाटपाचा असून 'इंडिया'मध्ये याच मुद्दयावरून गदारोळ चालू आहे. आगामी लोकसभा निवडणुकीसाठी भाजपची आखणी झाली.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827.
(विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# राज्यात 87 नव्या कोविडबाधितांची नोंद!

## JN.1 बाधितांची संख्या 10 वर; दोन कोरोनाग्रस्तांचा मृत्यू

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**देशभरात कोविडबाधितांची संख्या पुन्हा एकदा वाढू लागली आहे. कोरोनाचा नवा व्हेरिएंट असलेल्या JN.1 मुळे कोरोनाचा वेगाने फैलाव होत असल्याचे म्हटले जात आहे. महाराष्ट्रात आज 87 नवीन कोरोनाबाधितांची नोंद करण्यात आली आहे. तर, JN.1 व्हेरिएंटची लागण झालेल्या रुग्णांची संख्या 10 वर पोहचली आहे. आज दिवसभरात राज्यात दोन कोरोनाबाधितांचा मृत्यू झाला आहे.**



मुंबई महापालिका विभागात सर्वाधिक 19 कोरोनाबाधितांची नोंद करण्यात आली. राज्याचे आरोग्य विभागाने दिलेल्या माहितीनुसार, आज 14 कोरोनाबाधित रुग्णांना रुग्णालयातून डिस्चार्ज देण्यात आला आहे. तर, 87 नवीन कोरोनाबाधितांची नोंद करण्यात आली आहे. राज्यात दोन कोरोनाबाधितांच्या मृत्यूची नोंद करण्यात आली. हे रुग्ण पुणे आणि सांगली येथील असल्याची माहिती आहे. राज्यात कोरोना मृत्यू दर हा 1.81 टक्के इतका आहे. सध्या राज्यात JN.1 व्हेरिएंटची एकूण रुग्णसंख्या ही 10 वर पोहचली आहे. यापैकी 8 पुरुष आणि एक महिला रुग्ण आहे. या 9 रुग्णांपैकी एक रुग्ण 9 वर्षाचा मुलगा, एक रुग्ण 21 वर्षाची महिला, एक रुग्ण २८ वर्षाचा पुरुष आणि उर्वरित सर्व रुग्ण हे 40 वर्षावरील आहेत. यापैकी 8 रुग्णांनी कोविड लशीचे दोन्ही डोस घेतले होते. पुण्यात आढळलेला रुग्ण हा अमेरिकेतून प्रवास करून आला आहे. या रुग्णांना घरीच विलगीकरणात ठेवण्यात आले होते. या रुग्णांना सौम्य लक्षणे होती आणि रुग्ण बरे झाले असल्याची माहिती आरोग्य विभागाने दिली. भारतातील कोरोनाचा नवा व्हेरिएंट JN.1 फैलावत (Coronavirus Varient JN.1) असल्याचे चित्र आहे. मागील काही दिवसांपासून कोरोनाबाधितांच्या संख्येत पुन्हा वाढ होऊ लागली आहे. तीन दिवसांपूर्वी कोरोनाच्या या नव्या व्हेरिएंटची 22 प्रकरणे होती, त्यांची संख्या आता 110 वर पोहचली आहे. कोरोनाच्या जेएन.1 व्हेरिएंटचा पहिला बाधित केरळ मध्ये आढळला होता. पण सध्या गुजरात आणि कर्नाटकात याचे रुग्ण सर्वाधिक आहेत. बुधवार, 27 डिसेंबरपर्यंत आरोग्य मंत्रालयाच्या आकडेवारीनुसार, JN1 चे एकूण 110 रुग्ण आढळले आहेत. ज्यामध्ये या दोन राज्यांमधून सर्वाधिक प्रकरणे समोर आली आहेत. केंद्र सरकारही याबाबत सतर्क झाले आहे. राजधानी दिल्लीतही JN.1 व्हेरिएंटच्या पहिल्या बाधिताची नोंद करण्यात आली आहे. JN.1 व्हेरिएंट पहिल्यांदा ऑगस्टमध्ये आढळून आला. हा ओमायक्रॉनचा उप-प्रकार BA.2.86 ने तयार झाला आहे. 2022 च्या सुरुवातीला BA.2.86 व्हेरिएंट कोरोनाबाधितांची संख्या वाढवण्यास कारणीभूत ठरला होता. BA.2.86 व्यापकपणे फैलावला नव्हता. मात्र, तज्ज्ञांनी या व्हेरिएंटवर चिंता व्यक्त केली होती. BA.2.86 च्या स्पाइक प्रोटीनवर अतिरिक्त म्युटेशन झाले होते. त्याच प्रकारे JN.1 स्पाइक प्रोटीनवरही एक अतिरिक्त म्युटेशन आहे.

जागतिक स्तरावर केसेसमध्ये झालेली वाढ हे सूचित करते की JN.1 – Omicron चे उप-प्रकार – मजबूत प्रतिकारशक्ती असलेल्यांना देखील सहजपणे संक्रमित करू शकते. यूएस सेंटर फॉर डिसीज कंट्रोल (CDC) ने याचे वर्णन यूएस मध्ये सर्वात वेगाने फैलावणारा व्हेरिएंट म्हटले आहे.देशभरात कोविडबाधितांची संख्या पुन्हा एकदा वाढू लागली आहे. कोरोनाचा नवा व्हेरिएंट असलेल्या JN.1 मुळे कोरोनाचा वेगाने फैलाव होत असल्याचे म्हटले जात आहे. महाराष्ट्रात आज 87 नवीन कोरोनाबाधितांची नोंद करण्यात आली आहे.

### गुजरात, कर्नाटकात सर्वाधिक रुग्ण

» राज्यात दोन कोरोनाबाधितांच्या मृत्यूची नोंद करण्यात आली. हे रुग्ण पुणे आणि सांगली येथील असल्याची माहिती आहे. राज्यात कोरोना मृत्यू दर हा 1.81 टक्के इतका आहे. सध्या राज्यात JN.1 व्हेरिएंटची एकूण रुग्णसंख्या ही 10 वर पोहचली आहे. यापैकी 8 पुरुष आणि एक महिला रुग्ण आहे. या 9 रुग्णांपैकी एक रुग्ण 9 वर्षाचा मुलगा, एक रुग्ण 21 वर्षाची महिला, एक रुग्ण २८ वर्षाचा पुरुष आणि उर्वरित सर्व रुग्ण हे 40 वर्षावरील आहेत. यापैकी 8 रुग्णांनी कोविड लशीचे दोन्ही डोस घेतले होते. पुण्यात आढळलेला रुग्ण हा अमेरिकेतून प्रवास करून आला आहे. या रुग्णांना घरीच विलगीकरणात ठेवण्यात आले होते. या रुग्णांना सौम्य लक्षणे होती आणि रुग्ण बरे झाले असल्याची माहिती आरोग्य विभागाने दिली. भारतातील कोरोनाचा नवा व्हेरिएंट JN.1 फैलावत (Coronavirus Varient JN.1) असल्याचे चित्र आहे. मागील काही दिवसांपासून कोरोनाबाधितांच्या संख्येत पुन्हा वाढ होऊ लागली आहे. तीन दिवसांपूर्वी कोरोनाच्या या नव्या व्हेरिएंटची 22 प्रकरणे होती, त्यांची संख्या आता 110 वर पोहचली आहे. कोरोनाच्या जेएन.1 व्हेरिएंटचा पहिला बाधित केरळ मध्ये आढळला होता. पण सध्या गुजरात आणि कर्नाटकात याचे रुग्ण सर्वाधिक आहेत. बुधवार, 27 डिसेंबरपर्यंत आरोग्य मंत्रालयाच्या आकडेवारीनुसार, ज्यामध्ये या दोन राज्यांमधून सर्वाधिक प्रकरणे समोर आली आहेत.

# व्याघ्रभूमीत आता ऑलिम्पिक खेळाडूही घडतील!

## 67 व्या शालेय मैदानी स्पर्धेंचे मुख्यमंत्री शिंदे यांच्या हस्ते उद्घाटन

।मुंबई।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशात सुरू केलेल्या 'मिशन ऑलिम्पिक २०३६'ची सुरुवात चंद्रपूर जिल्ह्यातील विसापूर क्रीडांगण येथून झाली आहे. २०३६ मध्ये भारतात ऑलिम्पिक स्पर्धेचे आयोजन करण्याचे व सर्वाधिक पदके जिंकण्याचे पंतप्रधानांचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी महाराष्ट्र आघाडीवर असेल. चंद्रपूरच्या व्याघ्रभूमीत आता ऑलिम्पिक खेळाडूही घडतील, असा विश्वास मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केला.**



मिशन ऑलिम्पिक २०३६' हे ध्येय डोळ्यापुढे ठेवून राज्याचे वन, सांस्कृतिक कार्य व मत्स्य व्यवसाय मंत्री तथा चंद्रपूरचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या संकल्पनेतून बल्लारपूर तालुका क्रीडा संकुलात आयोजित ६७ व्या राष्ट्रीय शालेय मैदानी क्रीडा स्पर्धेचे उद्घाटन मुख्यमंत्री शिंदे यांच्या हस्ते झाले. यावेळी ते बोलत होते. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, क्रीडामंत्री संजय बनसोडे, पालकमंत्री मुनगंटीवार, आ. रामदास आंबटकर, द्रोणाचार्य-अर्जुन व पद्मश्री पुरस्कारप्राप्त बहादूरसिंग चव्हाण, ऑलिम्पिक सुवर्णपदक विजेती हिमा दास, राष्ट्रीय खेळाडू ललिता बाबर, मालविका बन्सोड आणि व अधिकारी यावेळी उपस्थित होते. 'जय जय महाराष्ट्र माझा' या राज्यगीताने आणि दिप व मशाल प्रज्वलनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. ऑलिम्पिक खेळाडू मनजीत सिंग याने मुख्यमंत्री शिंदे यांच्याकडे मशाल सुपूर्द केली. मुख्यमंत्री शिंदे यांच्यासह सर्व पाहुण्यांनी अटल बिहारी वाजपेयी यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण केले. त्यानंतर मुख्य सोहळ्याला सुरुवात झाली. ६७ व्या राष्ट्रीय शालेय मैदानी क्रीडा स्पर्धेत १५५१ खेळाडू सहभागी झाले आहेत. यावेळी राष्ट्रीय खेळाडू संदीप गौण यांनी सर्व खेळाडूंना शपथ दिली. मिशन ऑलिम्पिक २०३६ बोधचिन्हाचे लोकार्पण करण्यात आले. मुख्यमंत्री शिंदे पुढे म्हणाले की, पालकमंत्री मुनगंटीवार यांनी देशभरातील खेळाडू येथे एकत्र आणण्याची किमया केली, यासाठी त्यांचे अभिनंदन.

### 'मिशन ऑलिम्पिक'ला सुरुवात

» लंडन येथील संग्रहालयातून शिवाजी महाराज यांची वाघनखं मुनगंटीवार आणत आहेत, याबद्दल त्यांचे अभिनंदन. ही स्पर्धा यशस्वी होईल व ऑलिम्पिकमध्ये पदक जिंकणारे खेळाडू या स्पर्धेतून तयार होतील, असा विश्वास उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी व्यक्त केला. विसापूरच्या क्रीडांगणातून 'मिशन ऑलिम्पिक'ला सुरुवात होत आहे, याचा आनंद आहे, अशी भावना पालकमंत्री मुनगंटीवार यांनी व्यक्त केली. क्रीडामंत्री बनसोडे यांनी या स्पर्धेसाठी मुनगंटीवार यांनी केलेले प्रयत्न आणि नियोजनाची सविस्तर माहिती दिली.

# 'भारत जोडो यात्रे'चं दुसरं पर्व!

## 14 जानेवारी ते 20 मार्चपर्यंत 6200 KM अंतर कापणार

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**



**राहुल गांधी (RAHUL GANDHI) यांच्या भारत जोडो यात्रेला देशभरातून मोठा प्रतिसाद मिळाला होता. भारत जोडो यात्रेच्या पहिल्या टप्प्यानंतर आता काँग्रेस दुसरी यात्रा काढण्याच्या तयारीत आहे. मिळालेल्या माहितीनुसार, लवकरच काँग्रेस भारत न्याय यात्रेला सुरुवात करणार आहे. यावेळी काँग्रेसच्या भारत न्याय यात्रेचा प्रवास मणिपूर ते मुंबई असा असेल. या प्रवासात काँग्रेस 6200 किलोमीटरचं अंतर पार करण्याच्या तयारीत आहे.**

'भारत न्याय यात्रा' 14 जानेवारीपासून सुरू होणार असून ती 20 मार्चपर्यंत चालणार आहे. काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे या दौऱ्याला हिरवा झेंडा दाखवतील. मात्र, या यात्रेचं नेतृत्व राहुल गांधी करणार की, आणखी कोणी? याबाबत काँग्रेस पक्षाकडून काहीही स्पष्ट करण्यात आलेलं नाही. काँग्रेसनं राहुल गांधी यांच्या नेतृत्वाखाली भारत जोडो यात्रा सुरू केली होती. 7 सप्टेंबर 2022 रोजी सुरू झालेला हा प्रवास जवळपास 5 महिने चालला. भारत जोडो यात्रेच्या माध्यमातून विविध राज्यातील काँग्रेस नेते राहुल गांधींसोबत कन्याकुमारी ते काश्मीरपर्यंत फिरले. या प्रवासात काँग्रेसनं सुमारे 3500 किलोमीटरचं अंतर कापलं होतं. काँग्रेसच्या वतीनं देण्यात आलेल्या माहितीनुसार, भारत जोडो यात्रेचा मुख्य उद्देश 'द्वेष, भीती आणि कट्टरता' या राजकारणाशी लढा देणं हा होता. याशिवाय केंद्र सरकारकडून लोकांच्या आशा-आकांक्षांकडे होणारं दुर्लक्ष आणि राजकीय केंद्रीकरण आणि अन्यायाविरुद्ध लढायचं आहे. काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे 14 जानेवारी रोजी मणिपूरमध्ये भारत न्याय यात्रेला हिरवा झेंडा दाखवतील. ही यात्रा 20 मार्चला मुंबईत संपणार आहे. भारत न्याय यात्रा 14 राज्यांतील 85 जिल्ह्यांतून जाणार आहे. भारत न्याय यात्रा मणिपूर, नागालँड, आसाम, मेघालय, पश्चिम बंगाल, बिहार, झारखंड, ओडिशा, उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश, छत्तीसगड, राजस्थान, गुजरात आणि महाराष्ट्रातून जाणार आहे. काँग्रेसचे सरचिटणीस जयराम रमेश यांना या यात्रेचं नाव न्याय यात्रा का ठेवलं? असं विचारलं तेव्हा ते म्हणाले की, आम्ही जनतेला आर्थिक, सामाजिक आणि धोरणात्मक न्याय देऊ, असं आश्वासन देऊ इच्छितो. पहिली यात्रा 12 राज्यांतून गेली, तर दुसरी यात्रा 14 राज्यांतून जाणार आहे. 'भारत न्याय यात्रा' 14 जानेवारीपासून सुरू होणार असून ती 20 मार्चपर्यंत चालणार आहे. काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे या दौऱ्याला हिरवा झेंडा दाखवतील. मात्र, या यात्रेचं नेतृत्व राहुल गांधी करणार की, आणखी कोणी? याबाबत काँग्रेस पक्षाकडून काहीही स्पष्ट करण्यात आलेलं नाही. काँग्रेसनं राहुल गांधी यांच्या नेतृत्वाखाली भारत जोडो यात्रा सुरू केली होती. 7 सप्टेंबर 2022 रोजी सुरू झालेला हा प्रवास जवळपास 5 महिने चालला.

### मणिपूर ते मुंबई असा असेल प्रवास

भारत जोडो यात्रेच्या माध्यमातून विविध राज्यातील काँग्रेस नेते राहुल गांधींसोबत कन्याकुमारी ते काश्मीरपर्यंत फिरले. या प्रवासात काँग्रेसनं सुमारे 3500 किलोमीटरचं अंतर कापलं होतं. काँग्रेसच्या वतीनं देण्यात आलेल्या माहितीनुसार, भारत जोडो यात्रेचा मुख्य उद्देश 'द्वेष, भीती आणि कट्टरता' या राजकारणाशी लढा देणं हा होता. याशिवाय केंद्र सरकारकडून लोकांच्या आशा-आकांक्षांकडे होणारं दुर्लक्ष आणि राजकीय केंद्रीकरण आणि अन्यायाविरुद्ध लढायचं आहे.राहुल गांधी (RAHUL GANDHI) यांच्या भारत जोडो यात्रेला देशभरातून मोठा प्रतिसाद मिळाला होता. भारत जोडो यात्रेच्या पहिल्या टप्प्यानंतर आता काँग्रेस दुसरी यात्रा काढण्याच्या तयारीत आहे. मिळालेल्या माहितीनुसार, लवकरच काँग्रेस भारत न्याय यात्रेला सुरुवात करणार आहे. यावेळी काँग्रेसच्या भारत न्याय यात्रेचा प्रवास मणिपूर ते मुंबई असा असेल.

# ऑलिम्पिक असोसिएशनचा निर्णय

## कुस्ती कारभारासाठी तीन सदस्यीय समिती गठित

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**



**क्रीडा मंत्रालयाने कुस्ती महासंघाची कार्यकारिणी बरखास्त केल्यानंतर ॲड हॉक कुस्ती समिती (तात्पुरती समिती) गठित करण्यात आली आहे. वर्ल्ड रेसलिंग फेडरेशनचे नवनिर्वाचित अध्यक्ष आणि त्यांच्या अध्यक्षतेखालील कार्यकारिणी निलंबित केल्यानंतर काहीच दिवसांत भारतीय ऑलिम्पिक संघाने भारतीय कुस्ती महासंघाचं कामकाज पाहण्यासाठी तात्पुरती समिती गठित केली आहे. भूपेंद्र बाजवा हे या समितीचे अध्यक्ष असतील.**

ऑलिम्पिक असोसिएशनच्या प्रमुख पीटी उषा म्हणाल्या, कुस्ती महासंघाचे नवे अध्यक्ष (संजय सिंह) आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी वैयक्तिक कारणांमुळे रेसलिंग फेडरेशनच्या घटनात्मक तरतुदींचे उल्लंघन केलं आहे. तसेच ऑलिम्पिक असोसिएशनच्या तत्त्वांच्या विरोधात स्वतःची मनमानी करत काही निर्णय घेतले होते. ऑलिम्पिक असोसिएशनने हे सर्व निर्णय रद्द केले आहेत. संजय सिंह यांनी कुस्ती महासंघाची निवडणूक जिंकल्यानंतर त्यांनी राष्ट्रीय स्पर्धेचं आयोजन केलं होतं. परंतु, स्पर्धा आयोजित करताना नियमांचं उल्लंघन केल्याप्रकरणी भारतीय कुस्ती महासंघाची कार्यकारिणी क्रीडा मंत्रालयाने बरखास्त केली. संजय सिंह यांनी कोणतीही पूर्वसूचना न देता कार्यकारिणी समितीची बैठक बोलावली होती.

तसेच राष्ट्रीय स्पर्धा तातडीने आयोजित केली आणि ही स्पर्धा आयोजित करत असताना नियमांचं पालन केलं नसल्याचा ठपका ठेवत केंद्रीय क्रीडा मंत्रालयाने भारतीय कुस्ती महासंघाची कार्यकारिणी बरखास्त केली. त्याचबरोबर, बृजभूषण शरण सिंह यांच्या मतदारसंघातील नंदिनी नगर येथे या स्पर्धेचे आयोजन करण्यात आल्याने साक्षी मलिकसह अनेक कुस्तीपटूंनी नाराजी व्यक्त केली होती. या सर्व पार्श्वभूमीवर क्रीडा मंत्रालयाने ही कारवाई केली होती. दरम्यान, आता ऑलिम्पिक असोसिएशनने कुस्ती महासंघाचा कारभार पाहण्यासाठी तातुपरती तीन सदस्यीय समिती नेमली आहे. भूपेंद्र सिंह बाजवा हे या समितीचे प्रमुख आहेत. त्यांच्याबरोबर एमएम सोमाया आणि मंजूषा कंवर हे या समितीतले सदस्य आहेत. तसेच ऑलिम्पिक असोसिएशनच्या तत्त्वांच्या विरोधात स्वतःची मनमानी करत काही निर्णय घेतले होते.

# माजी क्रिकेटपटूचा पंतला १.६३ कोटींना गंडा

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

हरियाणातल्या एका ठगाला नवी दिल्लीतल्या चाणक्यपुरी पोलिसांनी अटक केली आहे. या ठगाने राष्ट्रीय स्तरावर हरियाणाच्या १९ वर्षांखालील क्रिकेट संघाचं प्रतिनिधीत्व केलं आहे. या आरोपीचं नाव मृणांक सिंह असं आहे. त्याने जुलै २०२२ मध्ये दिल्लतल्या ताज पॅलेस हॉटेलची ५.५३ लाख रुपयांना फसवणूक केली होती. तेव्हा त्याने दावा केला होता की, तो आयपीएलमध्ये मुंबई इंडियन्स संघाचं प्रतिनिधीत्व करत आहे. मृणांक सिंह याने तो कर्नाटकमधील वरिष्ठ आयपीएस अधिकारी असल्याचा बनाव रचून देशभरात अनेक आलिशान हॉटेलांची, हॉटेल मालकांची, त्यांच्या व्यवस्थापकांची आर्थिक फसवणूक केली असल्याचं पोलीस तपासांत उघड झालं आहे. त्याने प्रसिद्ध भारतीय क्रिकेटपटू ऋषभ पंतचीही फवणूक केली आहे. २०२०-२१ मध्ये त्याने ऋषभ पंतला १.६३ लाखांचा गंडा घातला होता. मृणांक सिंहने बार, रेस्तराँ, तरुणी, मॉडेल्स, कॅबचालक, छोट्या दुकानांसह अनेक लोकांना लुबाडलं आहे. त्याच्या मोबाईलची प्राथमिक तपासणी केली असता तो अनेक मॉडेल्स आणि तरुणींच्या सातत्याने संपर्कात होता. या तरुणी आणि मॉडेल्सचे असंख्य फोटो आणि व्हिडीओ त्याच्या फोनमध्ये आहेत. यातले बरेचसे फोटो आणि व्हिडीओ आक्षेपार्ह असल्याचं पोलिसांनी सांगितलं. दरम्यान, मृणांकला न्यायालयासमोर हजर करून पोलिसांनी त्याची दोन दिवसांची कोठडी मिळवली आहे. या प्रकरणी पोलीस त्याची चौकशी करत आहेत.

# 'जमाल कुडू' वर तारा सिंगचा डान्स!

सनी देओल हा त्याच्या आगळ्या वेगळ्या भूमिकेसाठी ओळखला जाणारा अभिनेता आहे. यंदाच्या वर्षी त्याचा गदर २ नावाचा चित्रपट प्रदर्शित झाला होता. त्यानं हजार कोटींची कमाई करुन वेगळा विक्रम आपल्या नावावर केला होता. त्यानंतर आता सनी देओल आणखी एका वेगळ्या प्रोजेक्टमधून प्रेक्षकांसमोर येणार असल्याचे सांगण्यात येत आहे. दुसरीकडे सनीचा भाऊ बॉबी देओल हा ॲनिमल नावाच्या चित्रपटामुळे चर्चेत आला होता. त्यातील त्यानं जो खलनायक साकारला आहे त्याचे कौतुक होत आहे. त्यापेक्षाही त्यानं जमाल कुडु नावाच्या गाण्यावर जो डान्स केला आहे त्यामुळे बॉबी कमालीचा लोकप्रिय झाला आहे. खरं तर जमाल कुडु नावाचे हे गाणे जुनेच आहे. मात्र ॲनिमलमधून ते पुन्हा प्रकाशझोतात आले. सध्या सोशल मीडियावर सगळीकडे या गाण्याचे रिल्स आहेत. व्हिडिओ समोर येत असून त्याला नेटकऱ्यांचा जोरदार प्रतिसाद मिळताना दिसतो आहे. बॉबीच्या करिअरमध्ये ॲनिमलनं मोठी भूमिका बजावली आहे. त्याचं जोरदार कौतुकही होत आहे. त्याला प्रेक्षकांची मोठी पसंती मिळाली आहे. अशातच सनीनं देखील आपल्या भावाच्या त्या गाण्यावर डान्स केला आहे. तो लोकप्रिय होताना दिसत आहे. ख्रिसमसच्या निमित्तानं व्हायरल झालेल्या त्या व्हिडिओनं नेटकऱ्यांचे लक्ष वेधून घेतले आहे. त्यात सनीनं केलेला डान्स हा चाहत्यांच्या, नेटकऱ्यांच्या प्रतिक्रियेचा विषय आहे. गेल्या काही दिवसांपूर्वी देखील सनीचा एक गमतीशीर व्हिडिओ व्हायरल झाला होता.

# माधुरी दीक्षित निवडणूक लढवणार?

बॉलीवूडची धकधक गर्ल म्हणून लोकप्रिय असलेल्या माधुरीची नेहमीच चर्चा होत असते. आपल्या सौंदर्यामुळे, अभिनयामुळे माधुरीनं गेल्या तीन दशकांहून अधिक प्रेक्षकांच्या, चाहत्यांच्या मनावर अधिराज्य केले. केवळ भारतच नाही तर जगाच्या पाठीवर माधुरीच्या नावाची मोठी क्रेझ असल्याचे दिसून आले आहे. गेल्या काही दिवसांपासून बॉलीवूडमधील काही प्रसिद्ध अभिनेते पुढील वर्षी निवडणूकांमध्ये सहभागी होणार असल्याच्या चर्चांना उधाण आले आहे. त्यामध्ये प्रसिद्ध अभिनेते नाना पाटेकर यांच्या नावाची चर्चा आहे. दुसरीकडे अभिनेत्री माधुरी दीक्षित देखील भाजप पक्षाकडून निवडणूक लढवणार असल्याच्या चर्चांना उधाण आले होते. त्यावर माधुरीनं एबीपी माझाच्या कट्ट्यावर दिलेलं उत्तर खूप काही सांगून जाणारं आहे. माधुरी निवडणूकीच्या रिंगणात उभी राहणार असल्याचे कळताच सोशल मीडियावर वेगवेगळ्या चर्चांना उधाण आले होते. त्यावर माधुरीनं दिलेली प्रतिक्रिया त्या सगळ्या चर्चांना पूर्णविराम देणारे ठरले आहे. माधुरीनं राजकारणात प्रवेश करणार का यावर उत्तर देताना म्हटलं आहे की, चित्रपट हीच माझी मुख्य पॅशन आहे. त्यामुळे राजकारणात येण्याचा प्रश्नच येत नाही. ते माझं क्षेत्र नाही. माधुरीनं राजकीय क्षेत्रातील पदार्पणाच्या बातम्यांवर केलेलं भाष्य पुन्हा एकदा चर्चेत आलं आहे. तिनं स्पष्टपणे त्या निवडणूकीच्या बातम्यांवर मत व्यक्त केलं आहे.

# तुला ओळखलच नाही



लिपा ही एक नावाजलेली इंटरनॅशनल सिंगर आहे. जगाच्या पाठीवरील अनेक देशांमध्ये तिचे चाहते आहेत. सध्या दुआ लिपा ही वेगळ्याच कारणासाठी चर्चेत आली आहे. तिच्या व्हायरल झालेल्या त्या व्हिडिओवरुन तिला ट्रोल करण्यात आले आहे. त्याचं झालं असं की, बऱ्याच दिवसांनी दुआ लिपा ही पुन्हा भारतात आली आहे. राजस्थानच्या उदयपूर शहरात ती बाजारपेठांमधून फिरत असतानाचे व्हिडिओ आणि फोटो व्हायरल झाल्याचे दिसून आले. मात्र एवढ्या मोठ्या गायिकेला कुणीच ओळखले नाही. यावरुन सोशल मीडियावरील प्रतिक्रिया चर्चेचा विषय आहे. आम्ही या गायिकेला ओळखलेच नाही. असे थेटपणे नेटकऱ्यांनी म्हटले आहे. लिपाचा तो व्हिडिओ आणि फोटो पाहिल्यानंतर एका युझर्सनं लिहिलं आहे की, आम्ही तुला ओळखलंच नाही. तसंही उदयपूर पाहण्यासाठी अनेक विदेशी पाहुणे येतात. त्यात तू येऊन गेली हे आमच्या गावीही नव्हते. आम्हा कुणाच्याच लक्षात ती गोष्ट आली नाही. दुसऱ्यानं लिहिलं आहे की, तू कोण आहेस हे स्थानिक लोकांना माहिती असण्याचे काहीच कारण नाही. ते तुला कसे ओळखणार? तिसऱ्यानं म्हटलं आहे की, अरे त्या लिपाला मुक्तपणे फिरु द्या, तसेही तिला इथं कुणीही ओळखणार नाही. काही दिवसांपूर्वी लिपानं तिच्या कुटूंबियासमवेत दिल्ली दौऱ्याचे फोटो शेयर केले आहेत.


# सलमानच्या घराबाहेर चाहत्यांचा जल्लोष



बॉलिवूडचा भाईजान सलमान खानचा (SALMAN KHAN) आज 58 वा वाढदिवस आहे. सलमानचे चाहते तसेच बॉलिवूडमधील सेलिब्रिटी हे सलमानला वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. सलमानने रात्री कुटुंब आणि मित्रांसोबत वाढदिवस साजरा केला, याचे व्हिडिओ आणि फोटो सोशल मीडियावर व्हायरल झाले आहेत. आता सलमानचे चाहते त्याच्या घराबाहेर जमले असून ते जल्लोष कर आहेत. सलमान खानचे चाहते त्याच्या घराबाहेर डान्स करत आहेत. अशताच सलमानच्या घराबाहेरील चाहत्यांचे व्हिडिओ आणि फोटो सोशल मीडियावर चांगलेच व्हायरल होत आहेत. सोशल मीडियावर व्हायरल झालेल्या व्हिडीओमध्ये चाहते सलमानच्या घराच्या बाहेर रत्यावर डान्स करताना दिसत आहेत. भाईजानच्या वाढदिवसानिमित्त चाहते खूप उत्सुक आहेत. सलमानची एक झलक पाहण्यासाठी सलमानचे चाहते सलमानच्या घराबाहेर जमले आहेत. सलमान खानच्या चाहत्यांच्या सोशल मीडियावर व्हायरल झालेल्या व्हिडीओला एका नेटकऱ्यांनी कमेंट केली,"भाई का बड्डे है" तर दुसऱ्या युझरनं कमेंट केली, "हे खूपच क्युट आहे" सलमान खानच्या वाढदिवसानिमित्त करण जोहर, बॉबी देओल यांनी सोशल मीडियावर खास पोस्ट शेअर करुन सलमानला वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या आहेत. बॉबीनं सलमानसोबतचा फोटो शेअर करुन कॅप्शनमध्ये लिहिलं, "मामू आय लव्ह यू" तर करणनं देखील खास सलमानचा फोटो सोशल मीडियावर शेअर करुन त्याला वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या आहेत. काही दिवसांपूर्वी सलमानचा टायगर-3 हा चित्रपट रिलीज झाला. या चित्रपटानं बॉक्स ऑफिसवर धुमाकूळ घातला. या चित्रपटात कतरिना कैफ आणि इमरान हाश्मी यांनी देखील काम केलं. या चित्रपटाचं दिग्दर्शन मनीष शर्मा यांनी केलं तो सध्या बिग बॉस 17 हा कार्यक्रम होस्ट करत आहे.ट्युबलाईट, किक, बजरंगी भाईजान, दबंग या सलमानच्या चित्रपटांना प्रेक्षकांची विशेष पसंती मिळाली. टायगर व्हर्सेस पठाण या चित्रपटामधून सलमान प्रेक्षकांच्या भेटीला येणार, असं म्हटलं जात आहे. सलमानच्या आगामी चित्रपटांची प्रेक्षक उत्सुकतेने वाट बघत आहेत.

# डंकी' मधील 'मैं तेरा रस्ता देखूंगा' गाणं रिलीज

दिग्दर्शक राजकुमार हिरानीचा 'डंकी' हा चित्रपट सध्या बॉक्स ऑफिसवर धुमाकूळ घालत आहे. या चित्रपटाला सर्व प्रेक्षकांचे भरभरून प्रेम मिळत आहे. हा चित्रपट देशातीलच नाही तर परदेशातील प्रेक्षकांची मनं देखील जिंकत आहे. या चित्रपटातील डंकी या चित्रपटातील 'मैं तेरा रास्ता देखूंगा' हे गाणं नुकतेच रिलीज झाले आहे. शाहरुख खानने ट्विटर अकाऊंटवर 'डंकी' या चित्रपटातील 'मैं तेरा रास्ता देखूंगा' हे गाणं शेअर केलं. त्यानं या गाण्याला कॅप्शन दिलं,"मैं तेरा रास्ता देखूंगा या गाण्यात 'डंकी'चा प्रवास अत्यंत हृदयस्पर्शी भावनांनी मांडला आहे. हार्डीचे मनूसाठी बिनशर्त प्रेम! प्रीतम आणि अमिताभ भट्टाचार्य यांची ही धून हृदयाच्या प्रत्येक कोपऱ्यात पोहोचते आणि मंत्रमुग्ध करते. विशाल ददलानी, शादाब फरीदी आणि अल्तमश फरीदी यांचा आवाज. गाण्याची संपूर्ण कथा जाणून घेण्यासाठी थिएटरमध्ये या... मी तुमची वाट बघतोय!" 'मैं तेरा रास्ता देखूंगा' या गाण्यात हार्डी आणि





मनू यांच्यातील चित्रपटात दाखवलेल्या प्रेमाच्या गोडवा दाखवला आहे. डंकी या चित्रपटातील लुट पूट गया,निकले दी कभी हम घर से,ओ माही आणि बंदा या गाण्यांना देखील प्रेक्षकांची पसंती मिळाली. डंकी या चित्रपटातील शाहरुखच्या अभिनयाचं अनेकजण कौतुक करत आहेत. राजकुमार हिरानी यांनी दिग्दर्शित केलेल्या 'डंकी' हा चित्रपट बॉक्स ऑफिसवर चांगली कमाई करत आहे. या चित्रपटाने बॉक्स ऑफिसवर 140 कोटींहून अधिक कमाई केली आहे. जगभरात बॉक्स ऑफिसवर डंकी या चित्रपटानं 250 कोटींहून अधिक कमाई केली आहे. डंकी या चित्रपटात शाहरुखसोबतच तापसी पन्नू, विकी कौशल आणि बोमन ईराणी, यांनी देखील प्रमुख भूमिका साकारल्या आहेत.

# एल्गरच्या शतकाने वाढली चिंता!

## » दक्षिण आफ्रिकेनी घेतली 11 धावांची आघाडी

नवी दिल्ली ।
। वृत्तसंस्था

**भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यातील दोन सामन्यांच्या कसोटी मालिकेतील पहिला सामना सेंच्युरियनमध्ये खेळवला जात आहे. दुसऱ्या दिवसाचा खेळ संपला, तेव्हा दक्षिण आफ्रिका संघाने ५ गडी गमावून २५६ धावा केल्या आहेत. तसेच दक्षिण आफ्रिका संघाने ११ धावांची आघाडी घेतली आहे. डीन एल्गर १४० धावांवर खेळत आहे. मार्को जान्सेन ३ धावांवर नाबाद आहे.**

दक्षिण आफ्रिका संघाने ६६ षटकांत ५ गडी गमावून २५६ धावा केल्या आहेत. त्यामुळे त्याच्या हातात अजून ५ विकेट्स आहेत. आता भारताला तिसऱ्या दिवशी शक्य तितक्या लवकर दक्षिण आफ्रिकेला रोखावे लागेल आणि त्यांना पहिल्या डावात मोठी आघाडी घेण्यापासून रोखावे लागेल. दक्षिण आफ्रिकेने पहिल्या डावात ५० पेक्षा जास्त धावांची आघाडी घेतल्यास भारताला सामन्यात पुनरागमन करणे कठीण होईल. दुसऱ्या दिवशी केएल राहुलने आपल्या वैयक्तिक धावसंख्येच्या ७० धावांच्या पुढे खेळण्यास सुरुवात केली आणि आपले शतक पूर्ण केले. तो १०१ धावा करून बाद झाला. त्याचवेळी मोहम्मद सिराजने २२ चेंडूत पाच धावा करत राहुलला चांगली साथ दिली. प्रसिध कृष्णा नाबाद राहिला आणि भारताचा डाव २४५ धावांवर आटोपला. दक्षिण आफ्रिकेकडून कागिसो रबाडाने पाच, नांद्रे बर्गरने दोन आणि जॅन्सेन-कोईत्झेने प्रत्येकी एक विकेट घेतली. दक्षिण आफ्रिकेची सुरुवात काही खास नव्हती. एडेन मार्करम पाच धावा करून सिराजचा पहिला बळी ठरला. यानंतर एल्गर आणि टोनी डी जॉर्ज यांनी शानदार भागीदारी करत आफ्रिकेचा डाव पुढे नेला. जॉर्जी २८ धावा करून बुमराहचा बळी ठरला. पुढच्याच षटकात बुमराहनेही दोन धावांच्या स्कोअरवर पीटरसनला बाद केले. यानंतर डेव्हिड बेडिंगहॅमने ५६ धावांची खेळी खेळली आणि एल्गरसोबत उत्कृष्ट भागीदारी करत दक्षिण आफ्रिकेला सामन्यात आघाडीवर नेले. व्हर्न चार धावा करून बाद झाला. भारताकडून बुमराह-सिराजने प्रत्येकी दोन बळी घेतले. प्रसिध कृष्णाला एक विकेट मिळाली. दक्षिण आफ्रिकेचा कर्णधार टेम्बा बावुमाने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. भारताची सुरुवात काही खास झाली नाही



आणि कर्णधार रोहित पाच धावा करून रबाडाचा पहिला बळी ठरला. यानंतर यशस्वी जैस्वाल १७ धावा करून तंबूत परतला. तसेच शुबमन गिलही दोन धावा करून बाद झाला. २४ धावांत तीन गडी गमावल्याने भारतीय संघ अडचणीत आला होता. अशा स्थितीत श्रेयस अय्यर आणि विराट कोहली यांनी अर्धशतकी भागीदारी करत संघाला संकटातून बाहेर काढले. विराट ३८ धावा करून बाद झाला तर श्रेयस ३१ धावा करून बाद झाला. रविचंद्रन अश्विनने आठ आणि शार्दुल ठाकूरने २४ धावांचे योगदान दिले. जसप्रीत बुमराहही एक धाव काढून पॅव्हेलियनमध्ये परतला. दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या कसोटी मालिकेतील (IND VS SA TEST MATCH) पहिल्या सामन्यात टीम इंडियाचा फलंदाज-यष्टिरक्षक के. एल. राहुल (K.L.RAHUL) याने झुंजार शतक झळकावले. सेंच्युरियन मैदानात सुरू असलेल्या कसोटीत पहिल्या डावात भारतीय संघाचा पहिला डाव अडचणीत आला असताना राहुलने संघाला सावरले. एका बाजूला पडझड होत असताना दुसरीकडे राहुलने आफ्रिकन गोलंदाजांचा मारा निष्प्रभ करत झुंझार खेळी साकारली. राहुलच्या शतकाने काही विक्रम आपल्या नावावर केले आहेत. त्याने सचिन तेंडुलकर आणि कोहलीचाही विक्रम मोडला आहे. टीम इंडियाने आपल्या पहिल्या डावात सर्वबाद 245 धावा उभारल्या. यामध्ये के. एल. राहुलने 101 धावांचे योगदान दिले. त्यानंतर सर्वाधिक धावा विराट कोहलीच्या केल्या. त्याने 38 धावांची खेळी साकारली. तर, शार्दुल ठाकूरने 24 धावांची खेळी करत राहुलला मैदानात साथ दिली. राहुल मैदानावर फलंदाजीला तेव्हा टीम इंडियाची 4 बाद 92 धावा अशी स्थिती होती. त्यानंतर 121 धावा झाल्यानंतर सहावी विकेट पडली. त्यानंतर राहुलने शार्दुल ठाकूर आणि त्यानंतर बुमराह, मोहम्मद सिराज यांच्यासोबतीने राहुल टीम इंडियाचा डाव सांभाळला आणि एक सन्मामजनक धावसंख्याही उभारली. भारताच्या पहिल्या डावात राहुल सहाव्या क्रमांकावर फलंदाजीला आला होता. या काळात त्याने 137 चेंडूंचा सामना करत 101 धावा केल्या. या खेळी दरम्यान त्याने 14 चौकार आणि 4 षटकार लगावले. सेंच्युरियनमधील राहुलचे हे दुसरे कसोटी शतक ठरले. येथे भारतासाठी फलंदाजी करताना तो एका डावात सर्वाधिक धावा करणारा यष्टीरक्षक फलंदाज बनला आहे. राहुलने 101 धावा केल्या. याआधी ऋषभ पंतने नाबाद 100 धावा केल्या होत्या. सेंच्युरियनमध्ये कसोटी शतक झळकावणारा राहुल हा तिसरा खेळाडू आहे.

### सध्या फॉर्मात आहे राहुल

» केएल राहुलने टीम इंडियासाठी आतापर्यंत चमकदार कामगिरी केली आहे. त्याने 48 कसोटी सामन्यांमध्ये 2743 धावा केल्या आहेत. या कालावधीत त्याने 8 शतके आणि 13 अर्धशतके केली आहेत. राहुलने डिसेंबर 2014 मध्ये भारताकडून पहिला सामना खेळला होता. त्याने आतापर्यंत 75 एकदिवसीय सामन्यात 2820 धावा केल्या आहेत. या कालावधीत त्याने 7 शतके आणि 18 अर्धशतके केली आहेत. राहुलने 72 टी-20 सामन्यात 2265 धावा केल्या आहेत. के. एल. राहुलने 101 धावांचे योगदान दिले. त्यानंतर सर्वाधिक धावा विराट कोहलीच्या केल्या. त्याने 38 धावांची खेळी साकारली. तर, शार्दुल ठाकूरने 24 धावांची खेळी करत राहुलला मैदानात साथ दिली. भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यातील दोन सामन्यांच्या कसोटी मालिकेतील पहिला सामना सेंच्युरियनमध्ये खेळवला जात आहे. दुसऱ्या दिवसाचा खेळ संपला, तेव्हा दक्षिण आफ्रिका संघाने ५ गडी गमावून २५६ धावा केल्या आहेत. तसेच दक्षिण आफ्रिका संघाने ११ धावांची आघाडी घेतली आहे.

# बांगलादेशने न्यूझीलंडला त्यांच्याच घरात लोळवले

## » जेम्स नीशमच्या खेळीने न्यूझीलंडचा डाव सावरला

।नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**क्रिकेटमध्ये आज (दि.27) पुन्हा एकदा उलटफेर पाहायला मिळाला आहे. बांगलादेशने (BANGLADESH) परदेशात जात न्यूझीलंडचा 5 विकेट्सने धुव्वा उडवला. मेहंदी हसनच्या (MEHENDI HASAN) दमदार कामगिरीच्या जोरावर बांगलादेशने हा विजय मिळवला. मेहेंदीने अष्टपैलू कामगिरी करत हा विजय खेचून आणला आहे.**



हा सामना न्यूझीलंडमधील नेपियरच्या मैदानावर खेळवण्यात आला होता. बांगला देशने न्यूझीलंडला त्यांच्याच घरात जाऊन पराभूत करत नवा इतिहास रचला आहे. न्यूझीलंड आणि बांगलादेश दरम्यान 3 सामन्यांची टी20 मालिका खेळवण्यात येणार आहे. मालिकेतील पहिला सामना आज खेळवण्यात आला आहे. नेपियरच्या मैदानात खेळवण्यात आलेल्या या सामन्यात बांगला देशचा कर्णधार नजमूल हुसेन शांतो याने नाणेफेक जिंकत प्रथम गोलंदाजीचा निर्णय घेतला. यानंतर फलंदाजीसाठी उतरलेल्या न्यूझीलंडला चांगली सुरुवात करता आली नाही. केवळ 1 धाव केली असताना न्यूझीलंडने 3 विकेट्स गमावल्या. मेहंदी हसनने पहिल्याच षटकात टीम सफर्टला तंबूत धाडले. त्याला भोपळाही फोडता आला नाही. यानंतरच्या षटकात शोरीफुल इस्लामने फिन ॲलन आणि ग्लेन फिलीप्सला बाद केले. शोरीफुलने लागोपाठ दोन विकेट्स पटकावत न्यूझीलंडला धक्के दिले. शोरीफुलने सलग दोन धक्के दिल्यानंतर नीशमने न्यूझीलंडचा डाव सावरला. खराब सुरुवाती झाल्यानंतर डेरल मिचेलने 14 आणि मार्क चॅम्पेनने 19 धावांचे योगदान देत डाव सावरण्याचा प्रयत्न केला. पण मोठी धावसंख्या उभारण्यात त्यांना अपयश आले. दरम्यान, यानंतर फलंदाजीसाठी आलेल्या जेम्स नीशमने न्यूझीलंडच्या डावाला उभारी दिली. त्याने 29 चेंडूमध्ये 48 धावांचे योगदान दिले. शिवाय, मिचेल सॅंटनर 23 आणि ॲडम मिल्नेने 16 धावांचे योगदान दिले. नीशमच्या 48 धावांच्या खेळीच्या जोरावर न्यूझीलंडला 134 धावा करता आल्या. बांगला देशकडून शोरीफुलने 3, मेहंदी हसन आणि मुस्तफिजूर रहेमानने प्रत्येकी 2 विकेट्स पटकावल्या. तंजीम आणि रिशादने प्रत्येकी 1 विकेट घेतली.

### न्यूझीलंडने 2-1 ने विजय मिळवला

» 3 सामन्यांच्या वनडे मालिकेत न्यूझीलंडने 2-1 ने विजय मिळवला होता. न्यूझीलंडने मालिकेत पहिल्या 2 सामन्यात विजय मिळवला होता. मात्र, तिसऱ्या सामन्यात बांगला देशने न्यूझीलंडला पराभूत केले. पहिल्या सामन्यात न्यूझीलंडने DLS पद्धतीने 44 धावांनी विजय मिळवला होता.